Indian Academy of Pediatrics (IAP)

**महाराष्ट्र राज्य बालरोग तज्ज्ञ संघटना ( MAHAIAP )**

# पालकांसाठी मार्गदर्शक तत्वे :

**प्रकरण ३६ :**

## मानवी प्रतिकारहीनता विषाणूने ( HIV- Human Immunodeficiency virus) ग्रासलेल्या मुलाची काळजी तसेच मानवी प्रतिकारहीनता विषाणूग्रस्त आईच्या बाळाची काळजी


| | |
|---|---|
| अध्यक्ष २०२२ : | डॉ. हेमंत गान्गोलीया |
| सचिव २०२२-२३: | डॉ. अमोल पवार |
| मार्गदर्शक: | डॉ. जयंत उपाध्ये |
| समन्वयक: | डॉ. नरेंद्र नानिवडेकर |
| अनुवाद: | डॉ. जयंत पांढरीकर |
| पुनरावलोकन: | डॉ. चित्रा दाभोळकर, अविनाश शिरगावकर |

*Convener:* **Ira Shah**

*Members:* **Bhaskar Shenoy, SN Mothi, T Himabindu Singh**




HIV आणि AIDS ह्या दुर्धर रोगाने आजारी असलेल्या मुलांच्या बाबत आपल्याकडे अनेक गैरसमज आहेत. योग्य वेळेला निदान आणि पुरेसे औषधोपचार केल्यास ही मुले सामान्य जीवन जगू शकतात. त्याबाबत पालकांच्या शंकाना येथे उत्तरे देण्याचा प्रयत्न केला आहे.

**'मानवी प्रतिकारहीनता विषाणूने (HIV) ग्रासलेल्या मुलाची काळजी तसेच मानवी प्रतिकारहीनता विषाणूग्रस्त आईच्या बाळाची काळजी' या संदर्भात वारंवार विचारले जाणारे १० प्रश्न**

प्रश्न १ : मानवी प्रतिकारहीनता विषाणू -HIV म्हणजे काय ?
प्रश्न २ : मानवी प्रतिकारहीनता विषाणूमुळे आजार कसा होऊ शकतो ?
प्रश्न ३ : मानवी प्रतिकारहीनता विषाणूमुळे बाधित झालेल्या मुलाला सुदृढ कसे ठेवता येईल ?
प्रश्न ४ : मुलगा औषधे बरोबर घेतो आहे, ह्याची खातरजमा कशी करावी ?
प्रश्न ५ : माझ्या मुलात कोणती धोकादायक लक्षणे आढळल्यास मी मुलाला डॉक्टरकडे न्यायला पाहिजे?
प्रश्न ६ : मानवी प्रतिकारहीनता विषाणू -HIV संक्रमित आजार पसरू नये म्हणून काय खबरदारी घ्यायला पाहिजे ?
प्रश्न ७ : मुलांच्या आहाराबाबत काय काळजी घ्यावी ?
प्रश्न ८ : 'तू मानवी प्रतिकारहीनता विषाणू –HIV ने बाधित आहेस' हे मुलाला कसे समजावून सांगायचे ?
प्रश्न ९ : मानवी प्रतिकारहीनता विषाणू –HIV ने बाधीत मुलाला त्याचे सामाजिक, भावनिक जीवन सुसह्य होण्यास काय मदत करावी ?
प्रश्न १० : मानवी प्रतिकारहीनता विषाणू –HIV ने बाधित आईने जन्म दिलेल्या बाळाची काळजी कशी घ्यावी ?


**Under the Auspices of the IAP Action Plan 2020–2021**

**Piyush Gupta** IAP President 2021
**Remesh Kumar R** IAP President-Elect 2021
**Bakul Parekh** IAP President 2020
**GV Basavaraja** IAP HSG 2020–2021
**Deepak Ugra** National Co-ordinator

© Indian Academy of Pediatrics

## IAP Parent Guideline Committee

**Chairpersons:** **Piyush Gupta, Bakul Parekh**
**IAP Co-ordinators:** **GV Basavaraja, Harish Kumar Pemde, Purna Kurkure**

**Core Group**

*National Co-ordinator:* ***Deepak Ugra***
*Member Secretaries:* ***Upendra Kinjawadekar, Samir Dalwai***
*Members:* ***Apurba Ghosh, CP Bansal, Santosh Soans, Somashekhar Nimbalkar, S Sitaraman***

# मानवी प्रतिकारहीनता विषाणूने ( HIV- Human Immunodeficiency virus)ग्रासलेल्या मुलाची काळजी तसेच मानवी प्रतिकारहीनता विषाणूग्रस्त आईच्या बाळाची काळजी



**प्रश्न १**

### मानवी प्रतिकारहीनता विषाणू -HIV म्हणजे काय ?

HIV- Human Immunodeficiency virusम्हणजे 'मानवी प्रतिकारहीनता विषाणू' हा एक अतिशय घातक विषाणू आहे. तो शरीराच्या रोगप्रतिकारशक्तीला कमकुवत करतो आणि त्यालाच "AIDS" ( Acquired immunodeficiency syndrome) आजार म्हणतात. सर्व प्रकारच्या संक्रमणापासून शरीराचे संरक्षण करत असतात त्या पेशींवर हा विषाणू आक्रमण करतो . ह्या विषाणूच्या हल्ल्यामुळे त्या पेशी निकामी झाल्याने ती व्यक्ती कुठल्याही संक्रमणाला सहज बळी पडू शकते.

**प्रश्न २**

### मानवी प्रतिकारहीनता विषाणूमुळे आजार कसा होऊ शकतो?

मानवी प्रतिकारहीनता विषाणू-**HIV** ह्या विषाणूचा प्रसार खालीलप्रमाणे कुठल्याही मार्गाने होऊ शकतो

*मानवी प्रतिकारहीनता विषाणू-HIV बाधित व्यक्तीशी कुठल्याही प्रतिबंधक साधनांच्या वापरशिवाय लैंगिक संबंध आल्यास.

*रक्ताची योग्य तपासणी न करता मानवी प्रतिकारहीनता विषाणू- HIV बाधित व्यक्तीचे रक्त दिल्यास

*मानवी प्रतिकारहीनता विषाणू-HIV बाधित व्यक्तीच्या सुया टोचण्याकरिता वापरल्यास

* मानवी प्रतिकारहीनता विषाणू-HIV ग्रस्त आईने जन्म दिलेल्या बाळास.

**मानवी प्रतिकारहीनता विषाणू-HIV कसा पसरत नाही ?**

*अगदी सहज स्पर्श झाल्यास किंवा मानवी प्रतिकारहीनता विषाणू -HIV ग्रस्त व्यक्तीला आलिंगन दिल्यास


*शाळेमध्ये मानवी प्रतिकारहीनता विषाणू -HIV बाधित विद्यार्थ्याच्या बाजूला बसल्यास

* सोबत जेवल्यास व खेळल्यास

*पिण्याचा ग्लास, ताट वापरल्यास किंवा बाथरूम वापरल्यास

*डास चावल्यास

मानवी प्रतिकारहीनता विषाणू-HIVपासून संसर्ग झाल्यास 2 ते 4 आठवड्यात त्या व्यक्तीला फ्लू सारखी लक्षणे दिसू लागतात. ताप, घसा खवखवणे, थकवा जाणवणे इत्यादी आणि ती व्यक्ति बरी होते. त्यानंतर जोपर्यंत प्रतिकारशक्ती खालावत नाही तोपर्यंत त्या व्यक्तीला कुठलेही लक्षण दिसत नाही. अशा व्यक्तीला वेळीच उपचार न मिळाल्यास त्याला AIDS- “अधिग्रहित इम्युनोडेफिशियन्सी सिंड्रोम” होतो. पुढे वजन घटणे,थकवा, वारंवार ताप व संक्रमित आजार होणे, अशी लक्षणे दिसतात.



प्रश्न
3

## मानवी प्रतिकारहीनता विषाणूमुळे बाधित झालेल्या मुलाला सुदृढ कसे ठेवता येईल?

मानवी प्रतिकारहीनता विषाणू -HIV संक्रमित मुलाला ART म्हणजेच "अँटी रेट्रोव्हायरल थेरपी" दिली जाते. सध्या अशी गुणकारी औषधे उपलब्ध आहेत जी आजाराला काबूत ठेवतात आणि तो मुलगा अनेक दशके जवळपास सर्वसामान्य जीवन जगू शकतो.
मुलगा शाळेत जाऊ शकतो, मित्रासोबत खेळू शकतो, अभ्यासाव्यतिरिक्त खेळणे,संगीत, कला इत्यादी गोष्टी करू शकतो. अर्थातच त्या मुलाने वैद्यकीय सल्ल्यानुसार नियमितपणे औषधे घेणे व वेळोवेळी तपासणी करून घेणे आवश्यक आहे.
मधुमेह किंवा उच्च रक्तदाबाप्रमाणे मानवी प्रतिकारहीनता विषाणू -HIV ची औषधे आजार पूर्णपणे बरा करणार नाहीत. पण नियमितपणे औषधे घेतल्यास व वैद्यकीय सल्ल्यानुसार तपासणी केल्यास त्या मुलाचे जीवन नक्कीच सुसह्य होईल.
मानवी प्रतिकारहीनता विषाणू-HIV बाधित व संक्रमित मुलांनी राष्ट्रीय लसीकरण तक्त्यानुसार सर्व लसी अवश्य घ्याव्यात.
जन्माच्यावेळी बाळ सुदृढ असेल तर BCG ची लस घ्यावी. तोंडाद्वारे देणात येणाऱ्या पोलिओ लसीपेक्षा टोचून देणारी पोलिओची लस द्यावी. तसेच न्यूमोकोकल लस, कावीळ अ लस ,टायफॉईड या ऐच्छिक लसीसुद्धा त्या- त्या आजारांपासून संरक्षण देण्यासाठी द्याव्यात. मानवी प्रतिकारहीनता विषाणू -HIV ग्रस्त आजारी मुलाला जिवंत विषाणूच्या लसी देऊ नयेत.
इतर संक्रमित आजार रोखण्यासाठी उपाययोजना:
*सतत हात स्वच्छ धुणे व सभोवतालचा परिसर स्वच्छ ठेवणे
* इजा किंवा जखम असल्यास लॅटेक्सचे हातमोजे घालणे
* शरीरातून रक्त आणि इतर शारीरिकद्रव्य निघत असल्यास घरगुती ब्लिचिंग पावडर वापरणे
* जर मुलाला ताप, सर्दी, खोकला, अतिसार असे काही असल्यास ताबडतोब इलाज करणे
* तुमच्या सर्व शंकांचे निरसन तज्ज्ञ डॉक्टरकडून करून घेणे

## प्रश्न ४

### मुलगा औषधे बरोबर घेतो आहे, ह्याची खातरजमा कशी करावी?

* पालकांना व मुलांना (वयानुसार) मानवी प्रतिकारहीनता विषाणू -HIV आजार व उपचार याबद्दल शास्त्रोक्त माहिती सांगावी. मानवी प्रतिकारहीनता विषाणू -HIV चा उपचार सुरू करण्यापूर्वी त्यांची उपचार करून घेण्याची मानसिक तयारी आहे की नाही हे तपासून पाहावे.
* प्रथम डोस नेहमी वैद्यकीय देखरेखीखाली द्यावा. मुलाच्या मानसिक/ शारीरिक वाढीच्या समस्यांबद्दल पालकांना आधीच सांगून ठेवावे.
* कुटुंबीय मुलाला प्रत्येक वेळी औषधे घेतल्यानंतर प्रोत्साहनपर शाबासकीची थाप द्यावी.
* गोळ्या कशा गिळायच्या हे मुलांना शिकवावे, अगदी ४ वर्षाचा मुलगाही हे काम यशस्वीपणे करू शकतो. गोळी गिळण्यास सक्षम नसल्यास त्याला बारीक करून द्यावी किंवा ती गोळी "जेलकॅप्स" मध्ये टाकून गिळण्यास प्रोत्साहित करावे.
* पालकांनी मुलाचे गोळ्या घेण्याचे वेळापत्रक तयार करावे, गोळ्या छोट्या डब्यात तारीख, वेळ, वार टाकून ठेवाव्यात आणि तो ती औषधे घेतो आहे की नाही ह्याची खातरजमा करावी.
* त्यांना त्यांच्या स्वतःच्या तब्येतीची काळजी घ्यायला शिकवा आणि मार्गदर्शन करा.
* औषधांचा परिणाम होतो आहे की नाही, औषधे बरोबर घेतली जातात की नाही, त्याचे काही दुष्परिणाम तर होत नाही आहेत ना, ह्याकरिता नियमितपणे दवाखान्यात जाणे आवश्यक आहे.
* जर तिथे जाणे शक्य नसेल तर पालकांनी समुपदेशकाला किंवा मदत करणाऱ्या समूहाला घरी बोलवावे.
* इतर कौटुंबिक सदस्य, मित्र तसेच इतर सवंगड्यांना मदतगटाचा भाग बनण्यासाठी तयार करा.
* प्रोत्साहनपर समुपदेशनामुळेच व्यवस्थित इलाज सहज

## प्रश्न ५

### कोणती धोकादायक लक्षणे माझ्या मुलात आढळल्यास मी मुलाला डॉक्टरकडे न्यायला पाहिजे?

प्रत्येक पालकांना खाली नमूद केलेली सर्व धोकादायक लक्षणे माहिती पाहिजेत. म्हणजे तशी लक्षणे आढळल्यास ते ताबडतोब वैद्यकीय मदत घेऊ शकतील
* ताप १००.४ फे F/३८ से. असल्यास
* खोकला किंवा श्वास घेण्यास त्रास होत असल्यास
* पोटामधे गडबड असल्यास
* त्वचेवर चट्टे आल्यास किंवा जांघेमध्ये चट्टे आल्यास, तोंडात फोड आल्यास, पांढरे चट्टे जिभेवर व तोंडात आल्यास
* वागणुकीत बदल आढळल्यास किंवा शुद्ध हरपल्यास
* शरीरात इतर भागात रक्ताचे डाग/चट्टे आढळल्यास (कारणाशिवाय)
* कानात दुखू लागल्यास वा कानातून स्त्राव झाल्यास
* एखाद्या कांजण्याग्रस्त मुलाच्या किंवा संसर्गजन्य आजार असलेल्या मुलाच्या संपर्कात आल्यास

**प्रश्न ६**

## मानवी प्रतिकारहीनता विषाणू -HIV संक्रमित आजार पसरू नये ह्याकरिता काय खबरदारी घ्यायला पाहिजे?

सर्व साधारण खबरदारी जर सर्वांनीच घेतली तर नक्कीच ह्या रोगाचा प्रादुर्भाव आपण टाळू शकतो। आणि ही खबरदारी प्रत्येकानेच प्रत्येकासोबत (मानवी प्रतिकारहीनता विषाणू- HIV पीडित असो व नसो) घ्यायला हवी.

कोणती खबरदारी घ्यावी हे खालील प्रमाणे दिले आहे

* दुसऱ्या व्यक्तीच्या शरीरातील स्त्राव किंवा रक्त हाताळत असाल तर हातमोजे घालावयास हवे.
* रक्त व शारीरिक द्रव्य पुसायचे असल्यास पाव कप ब्लीच 2 कप पाण्यात टाकून स्वच्छ पुसावे.
* रक्त व शारीरिक द्रव्याने भरलेले कपडे साबण व पाण्याने स्वछ धुवावे. डाग लागले असल्यास ते ब्लीच किंवा क्लोरीन विरहित ब्लीचने काढावे.
* जे कपडे फारच भरले असतील व धुणे शक्य नसल्यास फेकून द्यावे.
* मानवी प्रतिकारहीनता विषाणू-HIV बाधित व्यक्तीचे टूथब्रश किंवा दाढीचे ब्लेड कधीही वापरू नये.


मुलांना HIV चा संसर्ग टाळण्यासाठी घ्यावयाच्या जबाबदारीबद्दल आवर्जून शिकवावे.

* नाकातून येणारे रक्त असो वा कुठे इजा झाल्यास स्वतःच कसा उपचार करावा हे त्यांना शिकवावे
* त्यांनी नेहमीच स्वच्छ हातरुमाल जवळ ठेवावा
* जखम झाली असल्यास ती स्वच्छ रुमालाने झाकून ठेवण्यास शिकवावे
* इतर कोणीही त्यांच्या जखमांच्या किंवा जखमेतून येणाऱ्या रक्ताच्या संपर्कात येऊ नये ह्याची खबरदारी घेण्यास मुलांना शिकवावे.

**प्रश्न ७**

## मुलांच्या आहाराबाबत काय काळजी घ्यावी?

मुलांच्या सुयोग्य शारीरिक वाढ व विकासाकरिता त्यांचा आहार हा समतोल आणि परिपूर्ण असावा. मुलाला दिवसातून 3 वेळा जेवण व एकवेळ नास्ता जरूर द्यावा



प्रश्न
८

## 'तू मानवी प्रतिकारहीनता विषाणू –HIVने बाधित आहेस' हे मुलाला कसे समजावून सांगायचे ?

* एखादा मुलगा मानवी प्रतिकारहीनता विषाणू –HIVने बाधित आहे हे त्याला कधी सांगावे हे त्याच्या वयावर अवलंबून आहे. तज्ज्ञांनुसार मुलगा दहा वर्षे वयाचा होण्यापूर्वी त्याला त्या बद्द्ल सांगावे. उशिरा सांगितल्यास गंभीर गुंतागुंत निर्माण होऊ शकते.
* लहान मुलाला मानवी प्रतिकारहीनता विषाणू –HIVने बाधित असल्याची कल्पना टप्प्या टप्प्याने द्यावी. त्याची आकलनशक्ती, भावनात्मक विकास इत्यादीचा विचार करून द्यावी. यामुळे तो मुलगा आजाराचा सामना करण्यासाठी मनाने सज्ज राहील.
* घरच्यांना सारखी काळजी वाटते की मुलाला ही गोष्ट सांगितली तर त्याला लोक नावे ठेवतील व वाळीत टाकतील. म्हणून ते मुलाला ही माहिती सांगण्याचे टाळतात. परंतु योग्य वेळेत सांगितल्यास इलाज व्यवस्थित करता येईल व कुठल्याही प्रसंगाला सामोरे जाता येईल.
* शाळेमध्ये व समाजामध्ये सकारात्मक वातावरण निर्माण केले पाहिजे. मुलांना लवकर सांगितल्यास पुढील संसर्ग टाळता येईल व मुलामुलांमध्ये भेदभाव टाळता येईल.
* मुलांना मदत करणारे म्हणजे वैयक्तिक पातळीवर काळजी घेणारी माणसे, सवंगडी किंवा शाळेतून मदत करणारे ह्यांनी नेहमीच मदतीचा हात देणे फायदेशीर राहील.
* मुलांसोबत पालक व घरच्या इतर मंडळींचे समुपदेशन करणे आवश्यक आहे.

प्रश्न
१

## मानवी प्रतिकारहीनता विषाणू –HIVने बाधीत मुलाला त्याचे सामाजिक, भावनिक जीवन सुसह्य होण्यास काय मदत करावी?

* मानवी प्रतिकारहीनता विषाणू –HIV मुळे होणारा आजार हा दीर्घकाळ चालणारा आजार असून त्यामुळे बदनामी, लाज, शरम वाटणे, सामाजिक ठपका राहणे, या आजाराबरोबरच इतर आजार होणे व मृत्यू होणे इत्यादी गुंतागुंती होतात. ह्याचा पालकांच्या आणि मुलांच्या वागण्यावर दुष्परिणाम होऊ शकतो, तसेच मुलांच्या व पालकांच्या आकलन शक्तीवर, मानसिकतेवर व भावविश्वावर दुष्परिणाम होऊ शकतो.

* अशा मुलांमध्ये वैफल्य, नैराश्य, एकाकीपण, वर्तणूकसमस्या, विरोधी भावना, अतिचंचलपणा, विरोधी विरोधक विकार (oppositional defiant disorder ODD) यासारखे मानसिक आजार होण्याची शक्यता असते.

* पौगंडावस्थेतील मुलांच्याबाबतीत त्यांच्या समस्या उदा. लैंगिकता, धोका पत्करण्याची प्रवृत्ती, HIV झाल्याचे माहीत झाल्याने होणारी विचारांची गुंतागुंत इत्यादी बाबीकडे विशेष लक्ष द्यावे लागते.

* पालक व काळजी घेणाऱ्या व्यक्तींचे आरोग्यपथकाद्वारे समुपदेशन करणे आवश्यक आहे, कारण तेच मुलांचे पालनहार आहेत.

* नैराश्य, चिडचीड वाढणे, मनाचा कल नसणे, निद्रानाश, आहार योग्य नसणे यासारखी धोक्याची लक्षणे, बेचैनी, स्वतःला इजा करून घेणे, आत्महत्या करण्याचा प्रयत्न करणे, आक्रमकता इत्यादी लक्षणे वेळीच ओळखणे आवश्यक आहे व अशावेळी आरोग्यतज्ज्ञांचा सल्ला घेणे आवश्यक आहे.

* वेळोवेळी मानसिक आजारासंदर्भात तपासणी करणे गरजेचे असते.

* ह्याकरिता कुटुंबनिगडित सर्वसमावेशक उपचार फायदेशीर ठरतात. सकारात्मक समुपदेशन, औषधे व CBT सारख्या मानसिक उपचार पद्धती योग्य ठरतात.

* जीवनकौशल्यपद्धतीचे प्रशिक्षण मुलांकरिता व पालकांकरिता मानसिक ताणतणाव कमी करण्यासाठी निश्चितच फायदेशीर ठरते.

प्रश्न
१०

## मानवी प्रतिकारहीनता विषाणू –HIVने बाधित आईने जन्म दिलेल्या बाळाची काळजी कशी घ्यावी?

मानवी प्रतिकारहीनता विषाणू –HIV बाधित गर्भवती स्त्रीकडून तिच्या बाळाला 3३ प्रकारे मानवी प्रतिकारहीनता विषाणू –HIV चा संसर्ग होऊ शकतो. गर्भाला रक्तपुरवठा करणाऱ्या वारेतून साधारण ५ % धोका, प्रसूतीच्यावेळी साधारण १५ ते २० % धोका व स्तनपानातून साधारणपणे १० ते १५ % धोका. परंतु मानवी प्रतिकारहीनता विषाणू –HIVने बाधित गर्भवती महिलेला ARV ची औषधे व्यवस्थित दिल्यास तिच्या होणाऱ्या बाळाला संसर्ग होण्याची शक्यता अगदीच नगण्य राहते.जरी मानवी प्रतिकारहीनता विषाणू (HIV) आईच्या स्तनातील दूधात आढळत असला तरीही त्याचबरोबर प्रतिकारशक्ती वाढवणारे अनेक घटक त्यामध्ये असतात , जे बाळाकरिता आवश्यक असतात. स्तनपान बाळाला अनेक रोगांचा प्रतिकार करण्याची शक्ती देते, म्हणूनच स्तनपानातून होणाऱ्या संभाव्य संसर्गापेक्षा स्तनपानाचे खूप फायदे आहेत.गर्भवतीच्या ARV च्या उपचारामुळे तिच्या दुधामधून येणाऱ्या मानवी प्रतिकारहीनता विषाणू- HIV संसर्गाची शक्यता शून्य होते आणि ते दूध बाळाला देण्यासाठी पूर्णपणे सुरक्षित ठरते. म्हणूनच सर्व HIV बाधित मातांनी तिच्या बाळाला स्तनपान करवे असे तज्ज्ञांनी सुचविले आहे। आईने बाळाला प्रथम ६ महिने फक्त आणि फक्त स्तनपानच करावे आणि ६ महिन्यानंतर स्तनपानासोबतच बाळाला पूरक आहार सुरू करावा. आईच्या दुधाशिवाय इतर कोणतेही दूध बाळाला देऊ नये. तुमचे डॉक्टर त्या बाळाला जन्मापासून ARV चे औषध देतील व ती औषधे ६ आठवड्यापर्यंत दिली जातील. कधी कधी ती औषधे १२ आठवडे देण्यात येतात.

**योनीमार्गातून की सिझेरियन प्रसूती**

संशोधित नविन ARV च्या उपचारामुळे गर्भवती महिलेच्या शरीरातील HIV हा दबून जातो व त्याचा प्रभाव हा नगण्य राहतो. अशा स्थितीत महिलेची योनीमार्गातून नॉर्मल प्रसूती करता येते , कारण प्रसूतीच्या वेळी होणाऱ्या संसर्गाची शक्यता अगदीच कमी असते. जर HIV विषाणूंचे प्रमाण जास्त असेल तर सिझेरियनने बाळाचा जन्म होऊ शकतो. या परिस्थितीत बाळाला संसर्ग होण्याची शक्यता नॉर्मल प्रसूतीपेक्षा कमी असते.

**प्रसुतीपश्चात बाळाची काळजी**

बाळाचा जन्म झाल्यावर लगेच व एक ते दीड महिन्यांनी त्याची तपासणी PCR पध्दतीने करावी. तसेच जेव्हा स्तनपान बंद केले जाईल त्यावेळेस तपासणी पुन्हा करावी. मानवी प्रतिकारहीनता विषाणू (HIV) ची तपासणी पुन्हा दीड वर्षाच्या वयात ELISA पध्दतीने करावी. जर कोणतीही तपासणी मानवी प्रतिकारहीनता विषाणू (HIV) करीता पोझिटीव्ह आली तर पुन्हा तपासणी करून निश्चित निदान करावे आणि तीही तपासणी पोझिटीव्ह आली तर बाळाला नियमित उपचार सुरू करावा.